पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १८/९/२००७** रोजी सकाळी ११:३०(साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**दाखल विषय**

**विषय क्र. ७७४**

मा.अशोक येनपुरे, मा.वसंत मोरे, मा.अरुण धिमधिमे, मा.राजन काची, मा.सुनिल कांबळे, मा.महादेव बाबर, मा.दिपक मानकर, मा.दत्तात्रय धनकवडे, मा.दिलिप उंबरकर, मा.विजय मारटकर, मा.विरेंद्र किराड, मा.सौ.कमल व्यवहारे यांचे दि. १७/९/२००७ चे पत्र.

पुणे शहरात सार्वजनिक गणेशोत्सव धार्मिक पध्दतीने मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. यामध्ये लहान मोठी शेकडो मंडळे सहभागी होत असतात. उत्सव साजरा करण्यासाठी खर्च करण्यासाठी मंडळे विविध संस्थांच्या जाहिरातीच्या माध्यमातून बॅनर आणि कमानी उभारत असतात. त्यांचेकडून मनपा प्रचलित दराने परवाना फी घेते. मंडळाचे दृष्टीने सदरची फी खूप आहे. तरी गणेशोत्सव मंडळांकडून बॅनरसाठी व कमानीसाठी एकवट र.रुपये ५००/- परवाना फी आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरची फी पुढील प्रत्येक वर्षी गींशोत्सवाच्या १० दिवसांच्या काळामध्ये आकारण्यात यावी. तसेच पुणे शहरात नवरात्र उत्सव हाही मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. यासाठीही नऊ दिवसाच्या काळामध्ये वरीलप्रमाणे फी आकारण्यास व सदरची कार्यवाही प्रतिवर्षी पुढील काळात करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. ७७५**

मा.सुनिल बनकर, मा.महादेव बाबर, मा.सौ.अलका खाडे, मा.वसंत मोरे, मा.अरुण धिमधिमे, मा.राजन काची, मा.सुनिल कांबळे, मा.दिपक मानकर, मा.दत्तात्रय धनकवडे, मा.दिलिप उंबरकर, मा.विजय मारटकर, मा.सौ.कमल व्यवहारे यांचे दि. १७/९/२००७ चे पत्र.

पुणे शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. यामध्ये लहान-मोठी मंडळे सहभागी होत असतात. यांचे खर्चासाठी मंडळे विविध संस्थांचे जाहिरात बॅनर लावत असतात. त्यांचेकडून मनपा परवाना फी घेते. ती मंडळाचे दृष्टीने खुप आहे. तरी गणेशोत्सव मंडळाकडून बॅनरसाठी व कमानीसाठी एकवट र.रुपये ५००/- परवाना फी आकारण्यात यावी. सदरची सवलत ही गणेशोत्सवाच्या १० दिवसांसाठी राहील.

**विषय क्र. ७७६**

पुणे शहरासाठी 'Sustainable City Planning in Pune with special focus on Mobility Urban Transport and Land Use Planning 2007-2009' करीता SIDA यांचेबरोबर काम करुन घेणेस व याकरीता त्यांच्या बरोबर आवश्यक ते करार करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/४३८ यांचे दि. १७/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७७७**

सन १९८७ साली शासनाने मंजूर केलेल्या पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्याच्या एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३८ नुसार पुनरावलोकन करताना लोकसंख्येचा भविष्यकालीन आढावा घेण्यासाठी गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स व इकॉनॉमिक्स, पुणे ४ या संस्थेची नेमणूक करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/४४४ यांचे दि. १८/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७७८**

पाणीपुरवठा प्रकल्प, पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी, परिवहन उपक्रमास वेतनआयोग फरकापोटी, शेजारसमूह गटाने सुचविलेल्या कामांसाठी, उड्डाणपूल, सूस रस्त्यासाठी वर्गीकरणाने रक्कम उपलब्ध करुन देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/४४७ दि. १८/९/२००७ चे पत्र.

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**